# संजय बनसोडे

# पिंजरा



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

## संजय लिंबाजी बनसोडे

लिखित

लघुकादंबरी

# पिंजरा

# पिंजरा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

पिंजरा (लघुकादंबरी)

संजय लिंबाजी बनसोडे
कवी लेखक पत्रकार
रा. चोंढी ( खु ), ता. सेनगाव, जि. हिंगोली

हल्ली मुक्काम :
1195/ 002 नकुल गायकर बिल्डिंग
पाटील आळी, हनुमान मंदिर जवळ
घणसोली गाव, नवी मुम्बई 400701

मोबाईल नंबर : 9819444028
email id: sbansode40@gmail.com
blog id : sanjaylbansode.blogspot.in
facebook id : facebook.com/sanjay.bansode.31542

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १ ऑगस्ट २०१८

अण्णाभाऊ साठे जयंती

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# *पिंजरा 1*



"जग बदल घालूनी घाव

सांगून गेले मला भीमराव"...

तुकाराम भाऊराव ऊर्फ अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राला एक शाहीर म्हणून परिचित असले तरी कथा आणि कादंबरी हे साहित्यप्रकारही त्यांनी ताकदीने हाताळले. तमाशा या कलेला लोकनाट्याची प्रतिष्ठा मिळवून देण्याचं श्रेय अण्णाभाऊंना दिलं जातं. पोवाडे, लावण्या, गीतं, पदं या काव्यप्रकारांचा त्यांनी सामान्य कष्टकरी जनतेत विचारांच्या प्रचारासाठी वापर केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय प्रश्नांविषयी महाराष्ट्रात त्यांनी मोठी जागृती केली. त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये त्यांनी शाहिरीतून दिलेलं योगदान महत्त्वाचं आहे.

अशा या महान साहित्यसम्राटाच्या चरणी माझी पिंजरा ही कादंबरी अर्पण...

' सत्याला जीवनाचा आधार नसला,  की प्रतिभा अंधारातील आरशाप्रमाणे निरुपयोगी ठरते.' असे आमचे अण्णा भाऊ म्हणायचे. अण्णा भाऊ नेहमी सांगत, मी ज्यांच्याविषयी  लिहतो ती माझी माणसं आहेत...
मीही हातात लेखणी घेऊन माझ्या माणसांवरच लिहण्याचा प्रयत्न करीत आहे. खरेतर त्यांच्या मणभर साहित्यापुढे माझे साहित्य कणभरही नाही. तरीही त्यांचे बोट धरून मी या साहित्य विश्वात पुढे जाण्याचा दृढनिश्चय केला आहे.

माझे हे तिसरे पुस्तक मी आज वाचकांच्या हवाली करण्यास उत्सुक आहे. "देऊ वादळाशी लढे" या माझ्या कवितासंग्रहाला आपण भरभरून प्रतिसाद दिला आणि 'ई साहित्यानी' माझी "दुष्काळी वावटळ" ही कादंबरी प्रकशित करून मला खरे साहित्यिक म्हणून नावारूपास आणले त्याबद्दल ई साहित्य टीमचे जितके आभार मानावे तितके कमीच.

ई साहित्याच्या वाचकांनी आख्या महाराष्ट्रामधून मला फोन, मेसेस , आणि ई मेल करून, माझ्या "दुष्काळी वावटळ" या कादंबरीची स्तुती केली,  शुभेच्छा दिल्या. मी ई साहित्य वाचकांचेही मनःपूर्वक आभार मानतो, की त्यांनी वेळात वेळ काढून माझ्या कादंबरीला न्याय दिला.

का कुणास ठावूक,  पण जनीचं पात्र मला लिहावसं वाटलं. आणि जनी विषयी मला जे सुचलं ते लिहत गेलो. जनी ही मला खूप जवळची वाटते. लग्ना अगोदर  त्या गावा विषयी, त्या घराविषयी , त्या नवीन नात्यांविषयी काहीही तिला माहिती नसते. फक्त आई वडील बोलले म्हणून ती बोहल्यावर चढली आणि आपल्याला

*पोरकी होऊन एका अनोळखी घरात नांदायला आली.*

*"पिंजरा" भाग १ ही माझी दुसरी कादंबरी ई साहित्य मार्फत आज प्रकशित होत आहे. या कादंबरीचा दुसरा भाग प्रकाशित करायचा की नाही,  हे मी पूर्णपणे वाचकांवर सोडून देतो. वाचक जर दुसरा भाग वाचण्यास उत्सुक असतील तर नक्कीच, मी लवकरात लवकर "पिंजरा" भाग २ प्रकाशित करण्याचा प्रयत्न करेन.*

*संजय लिंबाजी बनसोडे*

पिंजरा ह्या कादंबरीचा  भाग एक वाचला ही कादंबरी ग्रामीण भागातील स्त्री व्यथेवर आधारीत आहे ..कांदबरीच्या मुख्य पात्रात सोळा वर्षाची जनी ही अल्लड पण विवाहित मुलगी आणि तिच्यावर जुलुम करणारी सासु वच्छी यांची बरीच जुगलबंदी दिसून येते

लहाण वयात लग्न झाल्यावर संसाराची जबाबदारी खांद्यावर पडल्यावर त्या लहान वयात ती काय काय सोसते.आणि तिला पडलेल्या प्रश्नांना ती कशी समोर जाते...हे ह्या कांदबरीत

लेखक कवी संजय बनसोडे यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.लेखकाने कादंबरीच्या सर्वच पात्राला न्याय दिला आहे...कादंबरी वाचतांना..

जनी हे पात्र फार रंजक वाटले.सासर घरचे एक एक रहस्य तिला जेव्हा कळते तेव्हा तिच्या मनाची होणारी घालमेल लेखकांने योग्य टिपली आहे.....एकंदरीत पिंजरा कादंबरी प्रत्येकाने वाचण्यासारखी आहे...

लेखक कवी संजय बनसोडे ह्यांचे अभिनंदन व पुढील लिखाणास शुभेच्छा...

पिंजरा भाग दोन च्या प्रतिक्षेत........

कवयित्री

रजनी निकाळजे

काशीमीरा मीरारोड

**लेखकाची थोडक्यात ओळख**

संजय लिंबाजी बनसोडे
कवी लेखक पत्रकार
रा. चोंढी ( खु )
ता. सेनगाव
जि. हिंगोली

हल्ली मुक्काम

1195/ 002 नकुल गायकर बिल्डिंग
पाटील आळी, हनुमान मंदिर जवळ
घणसोली गाव, नवी मुम्बई 400701

मोबाईल नंबर : 9819444028
email id: sbansode40@gmail.com
blog id : sanjaylbansode.blogspot.in
facebook id : facebook.com/sanjay.bansode.31542

1) "सम्यक वर्तमानकाळ" या मासिक वृत्तपत्राचे नवी मुम्बई प्रतिनिधी.
2) "देऊ वादळाशी लढे" हा आंबेडकरी कवितासंग्रह प्रकाशित.
3) गीतकार म्हणुन सात गाणे आणि कथेतून साकारलेल्या दोन शॉर्टफिल्म .
4) देशोन्नती वृत्तपत्रात 100 पेक्षा अधिक कविता प्रकाशित. दैनिक सम्राटमधे अनेक लेख प्रकाशित.
5) अनेक कवी सम्मेलनमधे सहभाग.
६) दुष्काळी वावटळ हि कादंबरी ई-साहित्यामार्फत प्रकाशित

७) आगामी कादंबरी - " **गावकूस** " लवकरच...

८)त्रिरत्न सामाजिक संस्था (कल्याण ) या संस्थेमार्फत " भीम लेखणी विचारमंच" या माझ्या साहित्यिक ग्रुपला "समाजरत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले..

९) कुष्ठरोगी दिन-दलित सेवा संघ, बौद्ध एकत्रीकरण आणि मातृभूमी सेवाभावी संस्थेच्या वतीने माझ्या कार्याची दखल घेऊन सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले



# पिंजरा

आज जनी प्रथमच तिच्या सासरी आली होती. नुकतीच वयात आलेली सोळा वर्षाची पोर ती. माय बापाकडे मनसोक्त बागडणारी, खेळणारी, भेटेल त्याच्या खोड्या काढणारी ती आझाद पोर सासरी आल्यावर एखाद्या रानातल्या पोपटाला पिंजऱ्यात बंद करावे तसं तिला वाटत होतं. तिचं माहेरचं स्वातंत्र्य गळयातल्या काळया मण्यात बंदिस्त झाले होते.

तिच्या माय बापाच्या कूड़ाच्या घरापेक्षा सासरचं तिचं घर दगड मातीचंच पण मोठं होतं, मोठा पण लग्न न झालेला लंगड़ा दिर, लखव्यामुळे अंथरुणाला खिळून पडलेला व दम्याने हैरान असलेला सासरा, मनात येईल ते बडबडणारी तिची खट्याळ सासू आणि ज्याच्यामुळे ती या घरात आली तो तिचा नवरा. अनोळखी पण इथून पुढं पूर्ण आयुष्यभर सोबत असणारा, तिचे सर्वस्व...

पाहिला दिवस आनंदात गेला. सासूनी चेहऱ्यावरून फिरवलेला मायेचा हात. गावातल्या बायकांनी "खूप सुंदर सून भेटली हो तुम्हांला" म्हणून केलेले कौतुक, नवऱ्यासोबत घालवलेली पाहिली रात्र.. हे सर्व बघून तिला तिच्या नवीन जीवनाचे सुखी पर्व वाटत होते. ती आता झोपेत नवीन स्वप्न रंगवू लागली...

पूर्वेकडे तांबट फुटते न फुटते तसा बाजूच्या घरातून सासूचा आवाज आला, "ही महाराणी उठली नाही का अजून??? इज्या..... ऊठव तुह्या बायकोलं! हे माय बापाचं घर न्हाय उशीरालोक झोपायलं "

सासूचा आवाज ऐकताच जनीनं अंगावरील अंथरुण झुगारून खाड्कन् उठून कामाला लागली. घरासमोरचं भलं मोठं अंगण झाडणीने झाडून काढले, घर फड्याने

झाडून काढले, शेजारी असलेल्या बैलाच्या गोठयात जाऊन शेणाचा पव्हटा घेऊन तुटलेल्या टोपलीत पाणी आणि शेण कालवून साऱ्या अंगणात पोत्रा टाकला, साऱ्या घराला सारवून घेतले. त्यानंतर अंथरुणाला खिळून पडलेल्या सासऱ्याच्या खोलीत गेली. नव्या सुनेला बघून सासरा तिच्या चेहऱ्यावरून लकवा मारलेला थरथरता हात वर करीत मायेचा हात फिरवू पाहत होता पण तिला त्या चित्रविचित्र दिसणाऱ्या प्राण्याची भयंकर भीती वाटत होती. तिथे जास्त वेळ न थांबता खोकलून कफ थुंकण्यासाठी टोपलीत ठेवलेली राख त्या टोपलसकट तिने बाहेर आणली आणि बाहेर उकीरड्यात फेकली व चुलीतली नवीन राख त्या टोपलीत टाकून पुन्हा तिच्या सासऱ्याच्या बाजेखाली ठेवली. हे सर्व करतांना त्याची तिला फार किळस येत होती पण तिचा नाईलाज होता.

घरातील सारे काम आटपून हांडा आणि बाल्टी घेऊन शंभर दीडशे पावलावर असलेल्या विहीरीवर पाणी भरण्यासाठी निघाली. तिला जातांना बघून, लग्नात भेटलेल्या सुपाऱ्या अडकीत्यात फोडत असलेल्या सासूने आपल्या लंगड्या लेकाला डोळ्याने इशारा केला, तसा तो काठी टेकवत टेकवत तिच्या मागोमाग निघाला. जना डोक्यावर पदर घेऊन खालीमान घालून आपलं गुमानं पाणी भरत होती व घरातल्या रांजणात टाकत होती. लंगड़ा दिर रस्त्यावर थांबून तिच्यावर लक्ष ठेवत होता. विहीरीवर पाणी भरताना सर्वच जना साठी नवीन होते. ती विहीर, त्या बायका, तो रस्ता, विनाकारण तिच्यावर वॉच ठेवणारा तो लंगड़ा दिर आणि साऱ्यांच्या तिच्याकडे भीरभीरणाऱ्या त्या अनोळखी नजरा. त्यामुळे ती कावरीबावरी होत होती. विहिरीवर पाणी भरणाऱ्या बायका जनाला बघून एकमेकाशी पुटपुटत होत्या,

"कोन्हाची सून गं ही???? "

"आवं त्या पलाटावरच्या इज्याची बायको भांडखोर् वछलाची सून...... "

जना मात्र त्यांच्या बोलण्यावर लक्ष नसल्यासारखे करीत गुमानं आपले काम करीत होती.

सर्व काम आटोपल्यानंतर जनाचे नहानीत पडलेल्या कपड्याकडे लक्ष गेले. ती तिच्या सासू जवळ जावून हळूच म्हणाली,

"मामी, ते कपड़े धुव्वायला तळयावर जाते म्हणलं "

सासू घशात अडकलेला कफ़ खाकरत म्हणाली,

"हं... जा! पण मुकाट्यानं जायचं कपड़े धुवायचे अन् घरी यायचे, गावातल्या बाया लय खराब हायतं. कोणाला काय बी बोलायचं नाही, ना ओळख करायची. "

जनीनं मान हलवित नहानीतले कपड़े टोपलीत भरले, रुमालाची चुंबळ करून कपड्याची टोपली डोक्यावर घेतली. जनी तळयावर जाण्याच्या तयारीत असतांना सासूचा पुन्हा आवाज आला,

"जने....! थांब जरा! "

सासू, सासऱ्याच्या खोलीत जावून थोड्या वेळाने एका पिशवीत कपड़े घेऊन आली.

"ह्या पिशवीत तुह्या सासऱ्याचे कपड़े हायतं, आपले सगळयाचे कपड़े धूनं झाले कीं ही धू आणि पिशवीतच घेऊन ये "

जनीने मान हलवली व एका हातात ती पिशवी घेऊन तळयाच्या दिशेने निघाली.

सासूने पुन्हा तिच्या लंगड्या लेकाला इशारा केला. तो पुन्हा जनीच्या मागोमाग निघाला. आता जनीला त्याची भीती वाटतं होती तो तिचा का पाठलाग करत आहे हे तिला कळत नव्हते. थोड्या वेळाने ती तळयावर पोचली. बायांना बोलायचं नाही, ही आधिच सासूनी तंबी दिली. आणि दीर ही लक्ष ठेऊन. त्यामुळे जनीने त्या बायकाच्या लांबच दगड शोधून धुणं धुण्यासाठी घेतले व एकेक कपड़ा पाण्यात डूबवून त्या दगडावर आपटायला सुरुवात केली. जनी त्या बायकांच्या लांब जरी धुणं धुत होती तरी तिला त्या बायकांचा संवाद स्पष्ट ऐकू येत होता. जनीला बघून त्या बायका एकमेकास बोलत होत्या, "मांगाच्या वछलाची सून हाये वाटतं, लंगड्याच्या बायकोनं तर जाळून घेतलं. ही रंभा काय माहीत किती दिवस टिकते तिच्या हाताखाली. "

लंगड्या दिराचे लग्न झाले आणि त्याच्या बायकोने जाळून घेतले हे ऐकून जनीच्या अंगावर काटाच उभा राहिला. ती सुन्न झाली. कारण ही गोष्ट तिच्यापासून व तिच्या आई वडिलांपासून लपवून ठेवली होती. दगडावर कपड़े आपटण्याचा आवाज मंदावत ती त्या बायकांच्या बोलण्याकडे लक्ष देत होती. एकीचे झाल्यावर दूसरी म्हणाली,

"आवं, तिन्ह काही जाळून नाही घेतलं. त्या लंगड्यानं अन् वछलानं तिला जाळून मारलं. ते लंगड़ तिच्यावर संशय घेत होतं. तिचं गावात लफडं हाये या संशयाने त्यांनं अन् त्याच्या मायनं तीलं मारलं. "

"म्हणतात ना, लंगड्याला एक गूण आगळा. चला मी जाते"

हे ऐकून जनीच्या पायाखालीची जमीनच सरकली. धुणं धूनारे तिचे हात थरथरायला लागले. दीर तिचा पाठलाग का करतो, सासू कुण्या बायका सोबत का बोलू देत नाही हे तिला आता कळून चुकले होते पण तिचा नाईलाज होता. आपल्या गरीब आई बाबाने ज्या घराशी आपलं नातं जोडलं ते आता मरेपर्यंत तिला जपावे लागणार आहे. अगदी आहे तसे.

हळूहळू धुणं धुता धुता ती आपल्या भूतकाळात विलीन झाली. मनसोक्त खेळणाऱ्या, बागडणाऱ्या त्या जनीचे जणू सासरी पंखच छाटुन तिला एखाद्या पिंजऱ्यात बंद केले असे तिला वाटत होते. तिच्या माहेरातल्या मैत्रिणी सोबत घालवलेले दिवस तिला आपल्या डोळ्यासमोर दिसू लागले.

एक दिवस अशीच ती तिच्या मैत्रिणी सोबत अंगणात लंगडी खेळत होती. हसत खेळत, एकमेकास शिव्या देत त्यांचा खेळ चालू होता. खेळत असताना बाजूच्या भावकितल्या तिच्या मैत्रिणीच्या, रक्मीच्या घरात तिचा मामा आला होता. त्याची नजर त्या खेळणाऱ्या जनीकडे गेली अन् त्यांनी लगेच रक्मीच्या आईला विचारले,

"बाई... कुणाची पोरगी हाये ही! "

"ती... ती जनी हाये, आमच्याच भावकितल्या किसन्याची धाकटी पोरगी"

"हिच्यासाठी नवरदेव हाये बाई, मह्या बायकोच्या आत्यबहिणीचा पोरगा... लय दिसाचं तिनं मह्या मागं टूमने लावले, पोरगी पाह्य म्हणून. "

"पाह्य बोलून तिच्या बापालं, त्ये पण चांगल्या पोराच्या शोधात हायतं. "

क्षणाचा ही विलंब न करता रक्मीच्या मामाने जनीच्या घरी जावून नवरदेवा बद्दल माहिती सांगितली.

जनीच्या माय बापाला हे सोयीरपण बरे वाटले त्यामुळे त्यांनीही जास्त वेळ न घालवता सोयरीक झाल्यानंतर एका महिन्याच्या आतच लग्नाचा बार उडवला. अशा अचानक झालेल्या लग्नाने जनी काही दिवसातच आपल्या बालपणाला, गावाला, आई वडीलाला परकी झाली.

जनीचे आता सर्व कपड़े धुवून झाले होते. त्यामुळे तिनं सासूने दिलेल्या पिशवीतले कपड़े काढायला पिशवीत हात घातला आणि कपड़े बाहेर काढले. ते कपड़े काढल्यानंतर त्या कपड्याची अवस्था पाहून जनी घाबरली आणि हातातले कपड़े फेकून उलट्या करायला लागली.

कारण, ते कपड़े मानवी मूत्र आणि विष्ठेने माखलेले होते. तिथेही जनीचा नाईलाज होता. या साऱ्याची तिला आता सवय लावून घ्यायची होती. यातून तिची आता सुटका नाही हे तिला समजले होते. त्यामुळे किळस करीत का होईना तिने ते कपड़े धुवून काढले व घरी परतली.

जनीच्या मनात आता एका विशिष्ट भीतीने घर केले होते. मध्यरात्र झाली होती. कीर्र अंधार होता. त्या भयाण अंधारात रातकिड्याने कहर माजवला होता. कुत्री चित्रविचित्र आवाजाचा सुगावा घेत जोरजोरात भुंकत होती. जनी बाजेवर पडून होती पण मनात विचारांचे काहूर माजले होते. रात्रभर विचार आणि भीती सोबतच ती सकाळ होण्याची वाट बघत होती. हळूहळू भुंकणारे कुत्री शांत झाली तशी जनीची

भीतीही निद्रिस्त झाली. अचानक तिला तिच्या बाजेवर कुणीतरी बसल्याचा भास झाला अन् तिची छाती जोरजोरात धडधडायला लागली. हळूहळू तो तिच्या शरीरासोबत चाळे करायला लागला. कोण तो? नवरा तर खाली झोपलेला आहे. त्याच्या घोरण्याचा आवाज तिला स्पष्ट ऐकू येत होता. मंग हा कोण? हळूहळू त्याचे चाळे जास्तच वाढले. आता त्याचा हात तिच्या ब्लाउज पर्यंत पोचला. जनीचे शरीर आता थंडगार पडले. ती झोपेतच थरथरायला लागली. तिने हिम्मत करून डोळे उघडले, बघतो तर काय, तिच्या जवळ बसलेला तो दुसरा तिसरा कुणी नसून तिचा लंगड़ा दिर होता. त्याच्या एका हातात चाकू होता आणि एका हाताने तो तिच्या छातीवर हात फिरवत होता. जनी जोरजोरात ओरडण्याचा प्रयत्न करीत होती पण तिच्या तोंडातून आवाज निघत नव्हता. ती प्रतिकार करण्याचा प्रयत्न करीत होती पण तिचा हातही हलत नव्हता. शेवटी सर्व शक्ती एकवटुन ती उठली. अंगावरील अंथरुण बाजूला फेकले चोहीकडे नजर फिरवली पण कुणीच नव्हते.

अरेच्या, हे तर स्वप्न होते. किती भयंकर स्वप्न होते हे, काळीज चिरणारे. डाळणातले कोंबडे बाग देत होते. नुकतेच पूर्वेकडे तांबट फुटत होता. काल सासू ओरडली त्यामुळे जनी त्या झांजर रात्रीच उठून काम करायला लागली. सकाळ होईपर्यंत जनीच सारे काम आटपून झाले होते. ती आता हांडा आणि बाल्टी घेऊन विहिरीवर निघाली तोच समोरून कुणीतरी तिच्या घराकडे येताना दिसले. जनीने त्यांना थोडे न्याहळीत बघितले अन् जनीच्या आनंदाला पाराच उरला नाही. समोरून तिचे आई बाबा येत होते. तिने हांडा आणि बाल्टी तशीच टाकून दिली आणि धावतच येणाऱ्या आई बाबाकडे गेली. आई जवळ जावून भर रस्त्यात तिने आईला घट्ट मिठी मारली. त्या क्षणभराच्या मिठीने जनी त्या पिंजऱ्यातून मुक्त झाली होती. तिला वाटत

होते आता पुन्हा त्या पिंजऱ्यात नको. बाहेरच्या बाहेरच आपण आई बाबा सोबत आपले माहेर जवळ करावे. पण हा पिंजराच तिला आयुष्यभराचा साथी आहे हे तिलाही माहीत होते.

जनीचे आई वडील आले त्यामुळे जनी खूपच आनंदी होती. तिचा आनंद गगनात मावत नव्हता. एकाद्या लहान मुलासरखे तिने आई वडिलाचे बोटे धरत आपल्या घराकडे नेले. रांजणातून गुंडी भरून पाणी काढले व त्यांना हातपाय धूयाला दिले. दारात आदळा आपट पाहून तिची सासू दारात आली,

"कोण आलं ग जने?? "

जनीच्या आई वडीलानी तिच्या सासूला बघताच तिच्या जवळ गेले,

"खुशाल का बाई "

"हो हो खुशाल, कधी आलात? "

"जने, चहा बनव तुह्या माय बापासाठी"

"नको नको जने, चहा नको! सूपवाडीला सावडायला जायचे. म्हटलं थोडी वाट वाकडी करून पोरीलं पाहून तरी जावं"

"हं... पहा पहा नीट निरखून पहा तुमच्या पोरीला, तीलं सुनवानी नाही लेकीवानी सांभाळतो. "

"(हसून) अहो तसं नाही, पोरगी नवीन हाये. घर सोडून अजून कुठं गेली नाही. म्हणलं थोडी वाट वाकडी केली तर पोरीलं तितकेच बरे वाटेल. "

"बरं बरं...... "

आनंदी झालेल्या जनीचा पुन्हा चेहरा पडला. तिचं काळीज धडधडायला लागले. हे काय? आई वडील मला घेऊन जाणार नाहीत? थांबणारही नाही? लगेच निघणार? असे एक ना अनेक प्रश्न तिच्या डोक्यात गोंगावत होते. ती त्यांना सासू देखत मनमोकळं बोलू ही शकत नव्हती. तिला खूप काही सांगायचे होते आपल्या आईला. आता सारे काही मनातच दाबून ठेवावे लागेल कित्येक दिवस. या कोंडवाड्यात माझा दम घुटतो आई. मला इथून घेऊन चल. मला या पिंजऱ्यातून आझाद कर आई. हे सांगण्यासाठी तिचे ओठ आतुर झाले होते. पण ती कशी सांगेल?? समोर सासू उभी आणि पाठी तिचा लंगडा दिर...

"जातो इहीनबाई, सांभाळा माझ्या मुलीला चांगले"

आई क्षणातच निघून जात आहे हे बघून जनी तिच्या गळयात गळा घालून ओक्साबोक्सी रडायला लागली.

"आई, थांबणा व एक दोन दिवस. असं लगेच जावु नको ना.... "

जनीचे असे रडणे बघून सासू कमरेवर हात ठेवून मोठ्या तोऱ्यात तिला म्हणाली,

"आता तुला काय झाले आसू गाळायला??? लय सासरवास करतो का मी तुहा?? काय बाई आजकालच्या पोरी.... दोन दिवस झाले नाही की मायच्या गळयात गळा घालून रडतात."

मानेला झटका देऊन सासू तोऱ्यात आत गेली. जनीची आई मात्र जनीला समजावत होती,

"नको बाई.. असं रडू नको. नवीन नवीन असेच होते. करमत नाही पण हळूहळू सवय लागते या सर्व गोष्टीची. आखाडी आता एका महीण्यावर राहिली. तव्हा तुहा बाबा येईल घ्यायला तव्हा चांगलं नव दहा दिवस राह्य माहेरात"

"चला मामी तुम्हांला उशीर होईल सूपगावची एसटी येईल आता. मी तुम्हांला स्टॉप पर्यंत सोडतो. "

माय लेकीचे बोलणे तोडीत मधेच लंगड़ा दिर बोलला..

"चला चला.. "

तिचे आई वडील जाण्यासाठी निघाले. जनीने रडतच त्यांना निरोप दिला. पार दिसेणासे होईपर्यंत जनी दारात उभी राहून बघत होती. जसे जसे तिचे आईवडील दूरदूर जात होते तसे तिला पुन्हा त्या पिंजऱ्यात कैद होण्याचा भास होत होता. आई बाबा गेले तसा तिच्या चेहऱ्यावरचा आनंदही गेला. दुःखाचा आवंढा गिळत ती पुन्हा कामाला लागली. ती आता आखाडीची वाट पाहू लागली. आखडी हा सण सासरवाशीन मुलींना आनंद घेऊन येणारा सण. लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच मुली आपल्या माहेरात जातात तो आखाडी सण. तो सण यायला अजून एक महीना बाकी होता. जनीची आता आई बाबासोबत त्या सणालाच भेट होणार होती.

संध्याकाळचे आठ वाजले होते. सर्वाचे जेवण झाले होते. जनी सर्व खरखटी भांडी एकवटुन अंगणात झिरो बल्पच्या उजेडात कशीतरी घासत होती. समोर नजर मारली तर सर्वत्र अंधारच दिसत होता. काळं कुत्रंही रस्त्यावर भीरकत नव्हते. कधी भांडी घासु अन् कधी बाजेवर गुमान पडू असे जनीला झाले होते. जनी पटापट भांडी घासण्यात मग्न होती. या घाईत तिचा कधी डोक्यावरचा पदर खाली पडला हे तिला

कळलेच नाही. जनी सासरी होती पण तिचे मन मात्र माहेरात होते. ती भांडी घासत होती पण तिच्या डोळयासमोर ते माहेरचे घर दिसत होते. तिचे अंगण आणि त्या अंगात असलेले ते झाड. ज्या झाडावर खेळत खेळत ती लहानाची मोठी झाली होती.

पण अचानक तिच्या समोर उभा असलेला आणि खाली पदर पडला म्हणून तिच्या छातीकडे एकटक बघणारा उग्र माणूस बघून ती जागी झाली. पडलेला पदर तिनं पुन्हा डोक्यावर घेतला. कोण तो? कुठून आला? त्याचे विचार काय बरोबर दिसत नाहीत. जनीने स्वतःला सावरले तरीही त्याची नजर तिच्या चेहऱ्यावरून हटत नव्हती. त्यांनी नजरेने कधीच तिच्यावर बलात्कार केला होता. जनी क्षणाचाही विलंब न करता भांडी घासून घरात शिरली. हे बघून त्या माणसाने जोरात आवाज़ चढवला,

"ये, लंगड्या हायस का घरात...?"

त्या माणसाचा आवाज ऐकून जनीची सासू ओरडतच बाहेर आली.

"कोण आलं रे इतक्या राती... कोण पाहीजे? का ओरडतो?"

पाय आपटत ओरडणाऱ्या तिच्या सासूला जेंव्हा त्या उग्र माणसाचे दर्शन झाले तेंव्हा मात्र जनीच्या सासूचा चेहरामोहराच बदलून गेला. त्या माणसाला बघून सासू हसरे तोड़ करीत म्हणाली, " सावकार तुम्ही, इतक्या रातीला? आमची तर झोपायची तयारी चालली होती. या या आत या!"

"काही गोष्टीची चर्चा रातीच्या अंधारातच कराव्या लागतात."

सावकार डुलत डुलत आत येत होता. तो दारू प्याला होता. डोळे लालबुंद झाले होते. भिंतीवर एक हात ठेवत ठेवत तो कसातरी आत आला. त्याला बसायला जनीच्या सासूने गोदडी टाकली. सावकार त्यावर मांडी घालून बसला.

"काय वछला! ईज्याचं लगीन झालं. तूह्या सूनेचे तोंड तं पाहूदे"

"हो सावकार, ये जने पाणी घेऊन ये गं! सावकार आलेत."

सासूचा आवाज़ ऐकताच जनी खाड़कन् उठून पाणी घेऊन आतच्या खोलीत गेली. सावकाराची नियत तिने पहिल्या भेटीतच ओळखली पण ती काही करू शकत नव्हती. ती तिच्या कुटुंबासमोर हतबल होती. जनी डोक्यावर पदर घेऊन आत शिरली. सावकार आल्यावर तिची सासू, नवरा, दिर सारेच सावकारा भोवती बसले होते. त्यांना बघून सावकाराची तिच्या घरात किती इज्जत आहे ते कळाले. जनीने समोर येऊन त्याला पाणी दिले. तो आताही तिला न्याहळीतच होता. त्याच्या मनात काय चालले हे जनी व्यतिरिक्त कुणालाही माहीत नव्हते.
"जने हे आपल्या गावचे सावकार... आम्ही संकटात असताना यांनीच मदत केली आम्हांला. पाया पड़ त्यांच्या"

सासूची आज्ञा ऐकून जनी लगेच खाली वाकुन त्याच्या पायावर माथा टेकवला.

"अरे राहू दे पोरी, उठ!"

असे बोलून सावकाराने तिच्या दोन्ही खांद्याला हात लावून तिला उठवायच्या बहाण्याणे तिला स्पर्श केला. त्या स्पर्शाने बावरलेली जनी अंग झटकीटत

बाजूला झाली. त्यानी खिशात हात घालून शंभर रुपये काढले अन् तिच्या हातावर टेकवत म्हणाला,

"वछला लय सुंदर सुन आणली घरात तू!"

"ते आमच्या हातात थोडं होतं सावकार. ईज्याच्या नशिबातच सुंदर पोरगी होती. तसा आमचा ईज्या पण कमी देखना नाय"

"बरं त्या बाकीच्या गोष्टी राहूद्या. मह्या पैशाचं काय ते सांगा??"

सासूनी डोळे वटारुन जनीकडे बघितले अन् म्हणाली,

"जने त्यो ग्लास घेऊन तूह्या खोलीत जा"

मान हलवीत जनी क्षणातच तेथून निघून गेली. पण कसले पैसे? नशेत चूर असलेल्या व माझ्याकडे वाईट नजरेने बघणाऱ्या सावकाराची इतकी इज्जत का? हा विचार तिला परेशान करीत होता. जनी तिच्या घरात नवीनच सासूरवाशीन होती. तिला तिच्या घरातल्या प्रत्येक गोष्टीची माहिती हवी होती. तिच्या घराला सारं यटाळ वाईट का म्हणते? लंगड्याने त्याच्या बायकोला का मारले? सासरा अंथुरणाला खिळून का आहे? प्रत्येक वेळी तिच्या मनात हेच विचार घोळत होते. पण तिला सांगणार कोण?

तिचा नवरा.... ज्याच्या समोर ती डोक्यावर पदर घेऊन एकाद्या मळ्यासारखी गप्प असते??

का तिचा दिर.. जो सारखा तिच्यावर नजर ठेऊन असतो??

का तिची सासू.. जी तिची छोटी छोटी चूक शोधून तिला कोसत असते?? ही माहिती तिला स्वतःलाच काढावीं लागेल हे तिला माहीत होते. जनी नववी पर्यंत शिकली होती. शाळेत खूप हुशार होती. तिला शिकून काहीतरी बनायचे होते पण गरीबीने तिला सोळाव्या वर्षातच नवरी बनवले. जनी भिंतीला कान लावून दुसऱ्या खोलीत सासूच्या आणि सावकाराच्या गप्पा ऐकण्याचा प्रयत्न करीत होती. लंगड्याने अन् त्याच्या मायने जेंव्हा लंगड्याच्या बायकोला जाळून मारले तेंव्हा लंगड्याच्या बायकोच्या आई वडिलांनी पोलीस केस केली होती. केस इतकी मजबूत होती की, लंगड्याला आणि त्याच्या मायला उम्रकैद होणार होती. सर्व पुरावे त्यांच्या विरोधात होते. तेंव्हा लंगड्याच्या सासूने शेती व घर सावकाराच्या नावावर करून एक मोठी रक्कम घेतली व ती केस रफादफा केली. आता सावकार त्याविषयी बोलण्यासाठी आला होता. त्याला एकतर जमीन हवी होती नाहीतर पैसा. सर्वांना शांत बसलेले बघून शेवटी सावकार बोलला,

"तुम्ही तिघांनी काय विचार केला? मलं जमीन देणार की पैसा?"

तेंव्हा जनीची सासू त्याला विनंती करीत म्हणाली, "नाही सावकार जमीन कशी देणार.... त्यावरच आमचं पोट हाये. जमेल तसा आम्ही पैसा फेडु तुमचा.."

"चाललं तुम्हालं जसं पटत तसं करा पण या दोन वर्षात मव्हा सगळा पैसा फेडा... अर्धा अवंदा द्या अन् अर्धा पुढच्या वर्षी. हाय का कबूल वद्धे! "

"अहो यंदा पोराच लगीन झालं होता नव्हता पैसा खर्च झाला आता तुम्हांला देण्यासाठी काय नाय मह्याकड"

"मंग ठीक हाये, तुह पोरगं सालानं ठेव मह्याकड यंदा नाहीतर जमीन दे वाह्यालं पैसे फिटेलोक"

जनीच्या सासूला आता समजले की, सावकार आता पैशाचं फुल-फायनल केल्याशिवाय इथून जाणार नाही. जनीची सासू जनीच्या नवऱ्याकडे बघून म्हणाली,

"तुह काय म्हणणं हाये ईज्या, आपल्याल पैसे तं देवाच लागणार असे नाहीतर तसे"

तेंव्हा जनीचा नवरा आपल्या मिशाला ताव देत म्हणाला, "माँ.... मी राह्यतो सावकाराच्या सालानं. तू आन् मही बायको बघा शेती यंदाच्या सालं"

शेवटी मीटिंग संपली सावकार डुलत डुलत निघून गेला. सर्वजण आपआपल्या बाजेवर झोपी गेले. जनीचा चेहरा मात्र सुन्न झाला होता. तिच्या डोक्यात विचारांचा भडिमार होत होता. दिवसेंदिवस तिच्या घरातल्या नवनवीन धक्कादायक गोष्टी समोर येत होत्या. ज्या जमिनीला व घराला बघून माझ्या आई वडिलांनी मला या घरात दिले. इकडून तिकडून पैसे घेऊन लग्न केले. ते घर आणि जमीन एका सावकाराच्या नावाने आहे. आणि ते पैसे फेडण्यासाठी माझ्या नवऱ्याला त्या सावकाराच्या शेतात गुलाम म्हणून काम करावं लागेल. छे छे! लंगड्याने आणि त्याच्या मायेने केलेल्या गुन्ह्याची सजा माझ्या नवऱ्याला का? त्यांनी खून करून मजा मारायची अन् माझ्या नवऱ्याने गुलामी करायची. जनीने मनात विचार केला आज आपण आपल्या नवऱ्याला हे बोलले पाहीजे. मी सर्वकाही सोडून त्याच्यामुळे तर या घरात आले. मी त्यांची अर्धांगी त्यांना समजावून सांगायचा माझा अधिकार बनतो.

तिने मनात पक्का निश्चय केला की, घाबरत का होईना पण त्या सावकाराच्या कामाला तुम्ही राहू नका. त्याची नियत चांगली नाही. तो माझ्याकडे वाईट नजरेने बघतो. जनीला तिच्या नवऱ्याला खूप काही सांगायचे होते त्यासाठी ती सकाळ होण्याची वाट पाहू लागली.

पूर्वेकडे नुकतेच तांबट फुटत होते. झापड झापड उजाडले होते. जनी उठून नेहमी प्रमाणे आपल्या कामाला लागली. पण तिचे आज कामात मन लागत नव्हते. काहीही करून तिला तिच्या मनातले नवऱ्याला सांगायचे होते. ती तिच्या नवऱ्याला बोलायची संधीच बघत होती. अंगण साफ केल्यावर ती घरात शिरली. घरात नवरा एकटाच काहीतरी काम करत बसला होता. आता हीच एक संधी आहे त्यांना बोलायची. ते शेतात गेले तर संध्याकाळ पर्यंत गावणार नाहीत. हे तिला माहीत होते. जनी प्रथमच आपल्या नवऱ्याला असे काही बोलण्याची हिम्मत करीत होती जे ऐकून तो काय बोलणार आणि काय करणार या विचारानेच जनीचे ओठ थरथरत होते. ती हिम्मत करून नवऱ्या जवळ गेली आणि म्हणाली,

"मलं तुमच्याशी बोलायचंय काही "

"बोल... काय बोलायच तुलं???? "

"मी काय बोलतो.. त्यो सावकार चांगला माणूस नाय दिसत मलं..
तुम्ही त्याच्या सालानं राहू नका. आपण दुसरा मार्ग काढू "

"लय शायणी झाली का तु??
मलं शिकवतेस् का? काय करायचं ते??
तुह्या मायची...... sssssss! "

असे बोलून खाड् खाड् जनीच्या कानाखाली तिच्या नवऱ्याने दोन तीन दिल्या. त्या थप्पडा जनीच्या कानशीलीत इतक्या जोरात बसल्या की, काही

वेळ तिचे डोकेच सुन्न झाले होते. ती कानाला हात लावून तशीच खाली बसली. जनीच्या नवऱ्याचा आरडाओरडा ऐकून जनीची सासू आणि लंगड़ा दिरही तिथे आला. सासू, वर आल्यावर घडलेली सारी हकीगत जनीच्या नवऱ्याने बयान केली. ती ऐकून जनीच्या सासूने कान धरून बसलेल्या जनीच्या पाठीत जोरात लाथ मारली. तशी ती सासूच्या माराने पाच सहा फूट लांब जावून पडली. सासू तिच्यावर डोळे वटारत तिला म्हणाली,

"मह्या पोराचे कान भरतेस का बारबीज्जे,

लय माज आला का तूलं....

थांब तुहा माजच ऊतरवते.. "

असे बोलून जनीची सासू पुन्हा तिला मारायला जात होती. ते बघून लंगड्या दिराने तिच्या सासूला अडवले. माझ्या बायको सारखे हिला ही मारून टाकेल या भीतीने लंगड़ा दिर मधे पडला. त्याला त्याच्या मायचा व भावाचा राग माहीत होता. खरेतर लंगड्याच्या बायकोचे खरे खूनी जनीची सासू आणि नवराच होता.. लंगड्याने मधेस्ती केल्यावर जनीची सासू शांत झाली. पण जनीच्या सासूनी जनीला पुन्हा खड़े बोल सुनावले,

"जने..... कान उघडे करून आईक घरातल्या कोणत्याच गोष्टीत नाक खुपसायचे नाही. काम करायचं अन् गिळून गप्प पडून राहायचं. पुन्हा जर आमच्यात नाक खुपसशील तर जितीच गाडीन.. "

जनी मात्र गुमानं मान खाली घालून गप्प होती. जनीला कळत नव्हते की, नेमका तिचा गुन्हा काय? तिला त्या घरात इतकाही हक्क नाही का? जनीला आज तिच्या नवऱ्याचे अन् सासूचे खरे रूप कळाले. मी माझे गाव, माझे घर, माझ्या मैत्रिणी, ज्यांनी मला जन्म दिला आणि तळहाताच्या फोड़ावानी आजवर जपले ते आई वडील. या सर्वाचा त्याग करून एका अनोळखी माणसाशी नाते जोडले. त्याच्या

आई वडीलाला भावाला आणि त्याला आपलसं केलं त्याची अर्धांगनी बनून स्वतःचे सुख, आईवडील सर्वकाही त्यागून ज्याच्या सोबत आली त्या व्यक्तीच्या मनात माझी कवडीचीही किंमत नाही हे बघून ती ढसाढसा रडायला लागली. ती एका अशा पिंजऱ्यात कैद होती ज्या पिंजऱ्यात तिला स्वतःच्या आई बाबानेच बंद केले होते.. ती असहाय्य होती. ती ह्या सासरच्या यातना आपल्या आईवडीलांनाही सांगू शकत नव्हती. कारण तिने तिच्या वडीलांचे हाल स्वतःच्या डोळयाने पाहिले होते. हूंड्याच्या पैशासाठी जीव की प्राण असलेल्या शेतीचा तुकड़ा तिच्या बापाने किती जड़ अंतःकरणाने विकला होता. त्याची आठवण येताच तिच्या डोळयातून आजही अश्रू आपोआप गळायला लागतात.. 'सासरीच मरायचं पण फारकती घेऊन माहेरात नाही यायचं' ही शिकवण लहानपणीच समाजाने तिला दिली होती. तिच्या गावातल्याच कित्येक मुलींनी सासरच्या त्रासाला कंटाळून मरण जवळ केले पण आई वडिलांचे नाक कापू नये म्हणून माहेरी आल्या नाहीत. अशा वातावरणात वाढलेली जनी आपल्या अन्याया विरोधात कसा विद्रोह करेल. माराच्या घावापेक्षा तिला, तिची इथे काहीच किंमत नाही. याचेच दुःख जास्त वाटत होते. माराच्या खुणा आपल्या पदराआड लपवून ती पुन्हा कामाला लागली. जसे घरात काही झालेच नाही.. घरातले सर्व काम झाल्यावर ती तिच्या लखवा मारलेल्या व दमाच्या बीमारीने त्रस्त असलेल्या तिच्या सासऱ्याच्या खोलीत, टोपलीतली राख बदलायला गेली. तेंव्हा तिने तिच्या सासऱ्याच्या डोळयात अश्रू बघितले. हे अश्रू, आज तिला त्या हैवानांनी मारले म्हणून होते हे जनीला ओळखायला जास्त उशीर नाही लागला. आज जनीला सासऱ्याच्या रूपात वडील दिसले. एक असहाय्य वडील जो अश्रू गाळण्या व्यतिरिक्त काहीही करू शकत नव्हता..

जनी आता एकएक दिवस मोजत आखाड़ीची वाट बघत होती. काही दिवसा करीता का होईना पण तिला या पिंजऱ्यातून काही दिवस आज़ादी मिळणार होती. त्या गावात, त्या रानात, त्या घरात ती पुन्हा जाणार होती जिकडे तिचे मन

रोज धाव घेत होते.. एक दिवस अशीच ती घरातील काम आटपून तळयावर  धुणं धुयाला गेली. बायकात मिसळायचे नाही, बायकांना बोलायचं नाही, बायकांसोबत धुणं धुयाचे नाही. ही अगोदरच सासूनी तिला तंबी दिली होती. त्यामुळे दररोज ती आपले बिऱ्हाड बायकांच्या लांबच मांडत असे.

आजही तिने असेच बायकांच्या लांब धुणं धूयाला घेतले. ती आपल्या कामात मग्न होती. एकएक कपड़ा पाण्यात बुडवून दगडावर आपटून धुत होती. तिच्या विस तीस मीटरवर एक व्यक्ती तिच्याकडे बघत उभा होता. जणू काही तिची वाट बघत होता. जनीने त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. फाटके व मळके कपड़े अंगावर. दाढी वाढलेली. जनीला वाटले तो एखादा भिकारी असावा. पण बाकी बायकांना सोडून तो मलाच का बघतो हे तिला समजत नव्हते. ती धुणं धुवून झाल्यावर टोपले डोक्यावर घेऊन निघाली. तो रस्त्यावरच उभा होता. जनी त्याच्या जवळूनच जात होती. ती जशी जशी त्याच्या जवळ जात होती तसा तसा त्याचा भेसुर चेहरा तिला स्पष्ट दिसत होता. तो एक असहाय्या, गरीब माणूस मला काहीतरी सांगण्यासाठीच येथे थांबला आहे असे तिला वाटत होते. जनीला बघून त्याच्या डोळयात आलेले अश्रू जनीला स्पष्ट दिसत होते. त्याला बघून जनीला दया आली. ती त्याच्या जवळ जावून म्हणाली,

"काका काय पाहीजे तुम्हाला??? काहून उभे राह्यले इथं इतक्या वाढळलोक?? "

"कोन पोरी, मी! तूह्यासाठीच थांबलो... "

तो शरीराने थकलेला, असहाय्य भासत होता. पण त्याचा आवाज कणखर होता. एक अनोळखी माणूस माझ्यासाठी थांबला हे ऐकून जनीलाही नवल वाटले...

"का.... काका, मह्यासाठी का थांबला. मी एक सासरवाशीन हाये.. सादा भाकरीचा तुकड़ाही मी तुम्हालं मह्या घरून देऊ शकत नाय. "

"पोरी.... मलं तूह्या घरचा भाकरीचा टुकड़ा नाय पायजे. "

"मंग काय पायजे काका.. "

"मलं तूह्याकडून न्याय पायजे... देशील का पोरी मलं न्याय तु.. मी पोलीस स्टेशनच्या चकरा मारून थकलो.. शेवटचा तूह्याकड आलो"

जनीला वाटलं हा कुणीतरी वेडा आहे. ती त्याचे बोलणे टाळत निघायला लागली. हे. बघून तो गृहस्थ तिला म्हणाला,

"जने.... मी वेडा नाही गं.. मी बाप हाये बाप. तूह्या सारख्याच सासरवाशीनचा बाप. जी आता ह्या दुनयात नाही.. "

हे ऐकून जनीचे पाय आपोआपच थांबले. हा गृहस्थ नक्कीच मला ओळखतो. ती थपकली, डोक्यावरचे टोपले उतरवून खाली ठेवले आणि त्याच्या जवळ गेली,

"काका कोन तुम्ही?? म्हपलं नाव कसं ठावूक तुम्हांला???? "

जनी आता त्याचं सारं काही ऐकण्यासाठी उत्सुक होती. तो कोन? त्याचं नाव काय? त्याची मुलगी कोणती? त्याला तिच्याकडून कसला न्याय हवा?? तो सांगत होता अन् जनी ऐकत होती.

तो मंगलचा बाप होता. ही मंगल दूसरी तीसरी कुणी नसून ती जनीचीच जाऊ होती. जनीच्या अगोदर मंगली तिच्या घरची सुन होती. मंगली ही लंगड्याची बायको होती. जिच्या बद्दल जनीने दुसऱ्याकडून ऐकले पण तिच्या घरच्यानी जिच्याबद्दल ब्र सूद्धा काढला नाही. तिचीच कहाणी आज जनी ऐकणार होती. ती कान धरून एक ना एक शब्द ऐकत होती.

मंगल तिच्या पेक्षाही गरीब कुटुंबातली. जनीच्या हूंड्यासाठी अन् लग्नासाठी जनीच्या बापाकड थोडीतरी जमीन होती पण मंगलच्या माय बापाचं

हातावरच पोट. ज्या दिवशी काम त्या दिवशी पोट भरलेले अन् ज्या दिवशी काम नाही मिळालं त्या दिवशी पाणी पिऊन रात्र काढायची... अशा बिकट अवस्थेत घरातली पोर जवान झाली. पण मंगलचा बाप करेल तरी काय? कुटुंबाच्या पोटाची व्यवस्था की तिच्या लग्नाची? इकडे वछला अन् तिचा नवरा परश्याही आपल्या लंगड्या मुलासाठी पोर बघून थकले होते. पण पोरगा एका पायाने लंगड़ा म्हणून त्याचे लग्न जुळत नव्हते.

एक दिवस असेच परश्याच्या अन् वछलाच्या कानावर आले की भिंगवाडीत एका गरीब किसण्याची पोर लग्नाला आली पण बापाकड लग्नासाठी पैसा नाही म्हणून उजवायची बाकी आहे. हे वछलाच्या अन् तिच्या नवऱ्याच्या कानावर येताच दोघेही भिंगवाडीच्या किसन्याच्या घरी गेले. तिला बघितले. अशी पोर आपल्या लंगड्याला शोधून मिळणार नाय. काही केले तरी ही सोयरीक हातची जावू द्यायची नाय असे वछलाने अन् परशाने ठरवले.

मंगलच्या बापाच्या घरची अवस्था इतकी बिकट होती की त्यांची लग्न लावायचीही हैशीयत नव्हती. त्यामुळे लग्नाची सारी जिम्मेदारी परश्याने अन् वछलाने उचलली. त्यांना कुठल्याही परिस्थितीत लंगड्याचे लग्न उरकायचे होते. लग्न व्यवस्थित झाले. अत्यंत गरीब घरातली मुलगी एका चांगल्या मोठ्या घरात जात होती.. सर्वांना आनंद झाला होता. तिच्या गरीब आई वडिलांचा आनंद तर गगनात मावत नव्हता. इतक्या चांगल्या घरात माझी पोर जाईल हे त्यांना स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते. मंगल नांदायला गेली. तिच्या त्या घरात पहिलाच दिवस. नवरा लंगड़ा असला तरी मंगल तिच्या आयुष्याच्या नवीन पर्वात खुश होती. त्या दिवशी ती त्या अनोळखी पण स्वतःच घरात, कामात मग्न होती. सासू लग्नात आलेल्या साड्या नीट पारखुन बघत होती. नवरा अंगणात बसला होता. दिर गोठ्यात काम करत होता.. अचानक गावातला एक पंधरा वर्षाचा पोरगा पळत तिच्या घराकड ओरडत आला,

"ओsss वछला मावशी.... तुमचा नवरा रानात बेशुध्द पडला हो......! "

त्या पोराचे बोल ऐकून अचानक सा़ऱ्याच्या अंगावर काटा उभा राहिला. सा़ऱ्यांनी शेताकडे धाव घेतली. त्याला घरी आणले. तालुक्यातल्या डॉक्टरला बोलवले. तपासल्या नंतर डॉक्टरनी त्याच्या अर्ध्या शरीरावर लकवा मारला असे सांगितले. त्याचे तोंड वाकडे झाले होते. आता त्याला बोलता ही येत नव्हते आणि चालताही येत नव्हते. तो आता अंथुरणाला खिळून पडला होता. हे बघून वच्छलाने मंगलचे केस धरून फरफटत घरात नेले. तिला बेदम मारले. ती किंचाळत होती. सासू समोर हात पाय पसरीत होती. वच्छलाचे तोंड आणि हात सारखाच चालत होता..

"अग पांढरपाये, आवदशे, तु आली अन् मह्या नव़ऱ्याच्या अंगावरुन वारं गेलं. तु आमच्या घरात साढ़ेसाती बनून आलीस. सटवे.... आज मह्या नव़ऱ्याला गिळले उद्या आम्हांलं गिळशील चालती हो मह्या घरातून! "

तिचा दिर आणि नवरा फक्त तो तमाशा बघत होते. त्यांचाही असाच समज होता की, मंगलचे पावलं लक्ष्मीचे नसून पांढरपेशी आहेत. वच्छलाने तिच्या पाठीत लाथ मारून तिला घरा बाहेर हाकलून लावले. आणि दरवाजा लावून घेतला.. शेजारीपाजारी नुसते बघत होते. वच्छला गावात सर्वात मोठी भांडखोर् बाई असल्यामुळे कुणी तिच्या मधे पडत नव्हते. मंगलला काहीच कळत नव्हते. पहिल्याच रात्री तिच्यावर ही दशा आली होती. ती जाईल तरी कुठे? तिच्या आई वडिलांचे हाल खूपच बिकट होते. ती वापस तिकडे जावून त्यांना ओझं बनणार् नव्हती. तिने सासूचा छळ स्वीकारला पण माहेर नाही. ती रात्रभर बाहेरच झोपली. बिना भाकरची बिना पाण्याची....

सकाळ झाली सारीकडे उजाडले पण मंगलीच्या डोळयासमोर अंधारच अंधार होता. तिला पुढचा रस्ता दिसतच नव्हता. ती मनातल्या मनात विचार करीत होती,

"माझा काय गुन्हा.......? सासऱ्याच्या अर्ध्या अंगाला लकवा मारला त्याला मी दोषी कशी काय?"

पण मनात आलेले विचार ओठावर आणून ती सांगेल तरी कुणाला.....! मंगली रात्रभर घरासमोरच्या झाडाखाली बसलेलीच होती. सकाळी सकाळी संडासला व पाणी भरण्यासाठी जाणाऱ्या बायका तिच्याकडे बघून तिला नाव ठेवित होत्या..

"माय.... किती चांगला माणूस व्हता वं, या पांढरपायी मुळं झाला का नाही अपाहिज.... हिलं लाज पण वाटत न्हाई, इतकं व्हवून पण इथच रातभर बसली..... मह्या सारख्या बाईनं तं, तडक माहेराचा रस्ता धरला असता माय.... "

लग्नात तिला न्याहळून बघणाऱ्या, तिला आशीर्वाद देणाऱ्या बायका आज तिला शिव्याशाप देऊन तिच्या नावाने बोटे मोडीत होत्या.

सकाळ झाली वछलानी दरवाजा उघडला आणि समोर तिला मंगली दिसली. तिला बाहेर बघून तिच्या रागाचा पारा अजून चढला आणि ती जोरात ओरडली,

"ईज्या... बाहीर ये,"

तिचं ओरडणं ऐकून दोघेही भाऊ बाहेर आले. नुकतेच लग्न झालेली बायको आज रात्रभर बाहेर झोपली हे बघून लंगड्याला तिची दया आली. पण ईज्याला तिचा खूप राग आला. तो रागाच्या भरात म्हणाला,
"ही पांढरपायी अजून गेलीच नाही का??? माँ... हाण तिलं लाता अन् दे हाकलून."

ते ऐकून वछलीने एक बाभळीच्या झाडाचा मोठा दांडका घेतला व मंगलीला मार मार मारत पुन्हा माहेरच्या वाटेला लावलं. मंगलीचा आता नाईलाज झाला. तिला वाटलं रात्रभर सासूचा राग शांत होईल आणि सकाळी मला त्या घरात घेतील. पण सासूचा राग सूतभरही कमी झाला नव्हता, उलट तिला बाहेर बघून आणखी वाढला. हे बघून मंगलीनं आपल्या माहेरचा रस्ता धरला. तिच्या सासरामधून माहेरात जाण्यासाठी तीन साढ़ेतीन घंट्याचा पाऊलवाटेचा पायी रस्ता होता. उपाशी पोटी ती चालतच राहिली. पांदीने, रानमाळाने. तिचे अवसान गळून गेले होते, शरीर थकून गेले होते. हिम्मत करून पाय पुढेपुढे टाकीत ती कशीतरी माहेरात आली. आल्यानंतर अंगणात येऊन ओक्साबोक्सी रडायला लागली. मंगलीच्या रडण्याचा आवाज़ ऐकून तिचे माय बाप धावतच अंगणात आले. मंगलीला असे अचानक आलेले आणि रडताना पाहून त्यांच्या पायाखालची जमीनचं सरकली. त्यांनी मंगलीला अगोदर शांत केले. घरात नेऊन तिला हिम्मत दिली. मंगलीने सासरी घड़लेला सर्व प्रकार रडत रडत आपल्या माय बापाला सांगितला. तिचा असा सासरवास ऐकून त्यांना खूप दुःख झाले. पण तिच्या मायबापाने हार मानली नाही. तिचे माय बाप गावातील काही प्रतिष्ठित नागरिक घेऊन पुन्हा मंगलीच्या गावात गेले मंगलीच्या सासरचेही काही प्रतिष्ठित नागरिक गोळा करून साऱ्यांनी वछलाची समजूत काढली. गावातील प्रतिष्ठित नागरिक बघून वछलाचे त्यांच्या समोर काही चालले नाही. तिला वाटले, मी जर यांना मंगलीला वागवणार नाही असे म्हटले तर, उद्या त्यांच्याच घरी मला या ना त्या कामांसाठी जावं लागतं. आधीच गावात माझं नाव खराब आहे आणि या प्रकरणामुळे आणखी होईल. त्यामुळे वछलानी त्यांचा प्रस्ताव मान्य केला आणि मंगलीला पुन्हा घरात घेतले. मंगली पुन्हा नांदु लागली. पण आता तिच्या सासरचे तिचा छळ करीत होते तिला त्रास देत होते तिला अपशकुनी

समजत होते. या ना त्या कारणासाठी तिला नेहमी टोमणे मारत होते.  पण ती सारेकाही सहन करून त्या घरात नांदत होती. इकडे मंगलीच्या माय बापाला तिची फार काळजी वाटत होती.

एक दिवस मंगलीची माय तिच्या बापाला म्हणाली,

"आहो, मलं काय वाटते! आपण उद्या परवाकड मंगलीच्या सासरी जाऊन तिला पाहून येऊ. मंगली जाऊन दहा बारा दिवस झाले एकदा तिचा सुखी संसार पाहिला की मंग बिनघोर जीव व्हईल मव्हा..."

"हो जाऊ आपण.. मलं पण एकदा जाऊन पाहू वाटायलं पोरीलं.. आपण उद्याचं जाऊ. मी आणतो कुणाकडून तरी उसने पैसे सीटं पुरते..."

असे घरात दोघे एकमेका बोलत असताना दारातून अचानक आवाज़ आला.

"मंगलीचे माय बाप तुम्हीच का?????"

परक्या माणसाकडून मंगलीचे नाव ऐकून त्यांच्या अंगावर काटाच उभा राहीला. कोण हे माणसं अन् मंगलीचं नाव घेऊन का विचारतात. ते दोघेही घाई गड़बड़ीत बाहेर आले. बाहेर चार पोलीस उभे होते. बाहेर पोलीस बघून दोघेही घाबरले, थरथरत्या आवाजात हात जोडित दोघे त्यांना म्हणाले,

"होय साहेब आम्हीच हाये.. काय झालं? असं अचानक का ईच्यारता......?"

"तुम्हांला आमच्या सोबत यावे लागेल. तालुक्याच्या पोलीस स्टेशनला. " पोलीस स्टेशनचे नाव ऐकल्यावर मंगलीच्या माय बापाची छाती धडधडायला लागली,

"का साहेब? कशासाठी....?"

ते ऐकून एक पोलीस मंगलीच्या बापा जवळ येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेऊन त्याला धीर देत म्हणाला,

"तुमच्या मुलीनी, मंगलीनी जाळून घेतलं. तिची डेढ़बॉडी सरकारी दवाखान्यात आहे. तिच्या घरच्यांचे आम्ही बयान घेतले आहे. तुमचे बयान घेतल्यानंतर बॉडी तुमच्या हवाली करण्यात येईल."

'मंगलीने जाळून घेतले' म्हटल्या म्हटल्या मंगलीच्या मायने जोरात हंबरडा फोडला. दोन्ही हाताने उर बडवुन ती जोरजोरात रडू लागली. ते बघून मंगलीचे भावंडं आणि बापही रडायला लागला. बघता बघता सारे शेजारी गोळा झाले. सर्व त्यांना धीर देत होते आणि समजावत होते. मंगलीची माय रडत रडत मंगलीच्या सासूवर आरोप करीत होती आणि पोलीसांना विनंती करीत होती की, माझ्या मुलीला तिनेच मारले तिला अटक करा... त्यावर पोलीस म्हणाले,

"हे बघा..! अगोदर स्वतःला आवरा. तुम्हाला जे पण बोलायचे ते पोलीस स्टेशनमधे बोला..."

दवाखान्यात गेल्यानंतर मंगलीच्या मायबापाला डॉक्टरनी सांगितले की, मंगली ऐंशी टक्के भाजली त्यामुळे येथे येण्याअगोदरच ती मृत्यु पावली होती.

मंगलीच्या सासूने  पोलीसांना वेगळेच बयान दिले होते. त्यांचे बयान ऐकून मंगलीचे माय बाप चक्रामधे पडले. ते बयान असे होते,

'मंगली लग्ना अगोदरच अनैतिक संबध होते. सदर व्यक्ती आम्ही घरी नसल्यावर मंगलीला भेटायला आमच्या घरी येत होता. हळूहळू हे प्रकरण आम्हांला कळले तेंव्हा आम्ही तिला या विषयावर चर्चा करून तिला माहेरी पाठवले पण मंगलीच्या माय बापाने काही प्रतिष्ठित माणसांसोबत येऊन आम्हांला विनंती करून पुन्हा तिला नांदायला पाठवले. त्या दिवशी आम्ही सारे शेतावर गेलो होतो आणि मंगलीने जाळून घेतले. आम्ही घरी आल्यानंतर हे सर्व चित्र बघितले आणि ताबडतोब आम्ही तिला दवाखान्यात घेऊन आलो.'

हे बयान ऐकून मंगलीचे माय बाप चक्रावून गेले. पोलिसांनी त्यांना त्यांचे बयान विचारले आणि मंगलीचे सत्य पोलीसांसमोर आले. मंगलीच्या गावात विचारपूस केल्यानंतर पोलीसांना कळले की, मंगलीच्या सासूचे बयान साफ खोटे आहे त्यामुळे मंगलीच्या सासूला दिराला आणि लंगड्याला अटक झाली. पण मंगलीची सासू दिर आणि नवरा जास्त दिवस जेलमधे नाही राहिले नाही. गावातल्या सावकाराच्या नावाने सारी जमीन लिहून त्यांनी पोलीस स्टेशनला हवे तितके पैसे ओतले आणि यातून सुटका करून घेतली. मंगलीचा बाप मात्र मंगलीला न्याय मिळवण्यासाठी पोलीस स्टेशनच्या चकरा मारतच राहिला....

जनी हे सारं ऐकून सुन्न झाली. थोड्या वेळापूर्वी फाटके मळके कपड़े अंगावर असलेला, एखाद्या भिकाऱ्या सारखा भासत असलेला तो व्यक्ती आता तिला बापासारखा वाटत होता. तिने मंगलीला कधी बघितले नव्हते पण ती तिची जाऊ बहीण होती. मंगलीच्या बापाचे दुख तिला तिचे दुख वाटत होते. हे सारं ऐकून तिला खूपच यातना झाल्या ती मंगलीत स्वतःला बघत होती. मंगलीला नाही तर तिच्या सासरच्यांनी तिलाच जाळले, असा तिला भास होत होता. ती गूडघ्यावर बसून रडू लागली. हे बघून मंगलीचा बाप तिच्या खांद्यावर हात ठेऊन म्हणाला,

"पोरी, रडू नको ग.. ह्यात तुहा काय गुन्हा?

गुन्हा तं त्या हरामखोरांनी केला.. मी त्यांना जेलची हवा चारल्याशिवाय मुका बसणार नाही.. "

जनी उठून डोक्यावर धुण्याचे टोपले घेत म्हणाली,

"बाबा... मी एक अशी सासरवाशीन हाये, जी तुम्हांला घरी नेऊन एक गीलास पाणी प्यायला पण देऊ शकत नाय..! मी जाते बाबा, जर माझ्या लंगड्या दिराने मला इथं तुमच्या सोबत पाह्येलं तर सासू मलं लय तरास देईल. "

मंगलीचा बाप काही न बोलता हात वर करून मागे वळला आणि चालायला लागला. जनीही तिच्या घराच्या दिशेने निघाली. जनी जड़ पावलाने पुढे पुढे जात होती. अचानक तिने पुन्हा मागे वळून बघितले व आवाज़ दिला,

"बाबा.... "

तिचा आवाज़ ऐकून मंगलीच्या बापाने मागे वळून बघितले,

"काय पोरी..... "

जनी त्याच्याकडे चार पावलं जाऊन म्हणाली,

"बाबा, कोणताही निर्णय घेण्या अगोदर एक गोष्ट ध्यानात घ्या..

तुमची जनी नावाची दूसरी पोरगी त्याच घरात नांदते, ज्या घरातल्या सगळयांना तुम्ही जेलमधे टाकणार आहात.. "

"पोरी...., नको पुन्हा नातं जोडू त्या घरासोबत मव्ह! त्या घरात माणसं नाय हैवान राह्येतात. मलं तू बाबा म्हणाली ना! तर बापाच्या नात्याने एक गोष्ट तुलं सांगतो, ते घर सोडून जाय पोरी तुह्या माय बापाकडं.. नाहीतर आज ना उद्या तूलही हे मह्या मंगली सारखं मारून टाकतील. जा....., तू जा माहेरात..... "

असे बोलून तो चालायला लागला. हळूहळू तो वळण रस्त्याने पुढेपुढे जात होता जनी मात्र टोपलं डोक्यावर घेऊन तो दिसेनासा होईपर्यंत त्याला एकटक बघतच होती. तो दिसेनासा झाला आणि जनी भानावर आली. आज तिला खूपच उशीर झाला होता. ती झरझर पाऊल टाकीत घराकडे निघाली. जनीची सासू मात्र ती अजून घरी आली नाही म्हणुन लालबुंद झाली होती. जनीला उशीराने घरी आलेलं पाहून वच्छली तिला बघून ओरडली,

"कुठं गेली होती वं रंडके येवढ्या येळ....? इतका उशीर कसा काय लागला तुलं.....! "

"ना.. नाही मामी.., धूयालं दगडच भेटत नव्हता त्यामुळं दुसऱ्या बायाच होवोस्तोर उभं राह्याचं काम पडलं...! "

"मेली कुठली.... जाय लवकर वाळू घाल धुणं. दूसरे काम पडलेत लय! "

जनी कपड़े धुवून वाळू घालू लागली आणि मनात विचार करू लागली, 'आज मी थोडक्यात वाचले. मला मंगलीच्या बापासोबत बघितले असते तर सासूनी मला जीतच खाल्ल असतं" जनी आता घरच्या सर्व माणसांना ओळखून होती. जाताजाता मंगलीच्या बापानं बोललेले शेवटचे शब्द तिच्या डोक्यातून जाता जात नव्हते 'त्या घरात माणसं नाय हैवान राह्येतात.. 'त्याचे बोलणेही जनीला रास्त वाटत होते. कारण, बीस पंचवीस दिवसातच तिला त्या हैवानाची प्रचिती आली होती. आता जनीला त्या घरात रहाणेही असह्य झाले होते. तिला आता सारखी डोळयासमोर मंगलीच दिसत होती. रात्र झाली की तिचं डोकं एका वेगळयाच गोष्टीचा वेध घेत होतं, इथंच मंगलीला जाळले असेल का? तिला किती त्रास झाला असेल ? माझ्या सासूला, नवऱ्याला आणि दीराला तिची थोडीही दया आली नसेल का? किती जोरजोरात ती किंकाळत असेल! हात जोडून विनंती करीत असेल. ऊफ... आपल्याला थोडा विस्तवाचा चटका जरी लागला तरी किती अंगाची लाहीलाही होते. किती वेदना होतात. आणि तिचे संपूर्ण शरीर जाळले. तिला शेवटच्या श्वासापर्यंत किती महाभयंकर त्रास झाला असेल...!

रोज सकाळी झाडू मारायचा, पोतरा घ्यायचा, नाक बंद करून सासऱ्याच्या खोलीतून त्याच्या थुंकीची राख बदलायची, विहिरीवरून पाणी भरायचे, धुणं धुण्या ओढ्यावर जायचे, स्वयंपाक करायचा, भांडी घासायची, रात्री नवऱ्याला तृप्त करायचे आणि हे सर्व करूनही विनाकारण नवऱ्याचा आणि सासूचा मार खायचा.. ह्या सर्वाला जनी अगदी कंटाळून गेली होती. तिला तिच्या आईवडीलाकडे जसं स्वातंत्र्य होतं, अगदी तसेच स्वातंत्र्य तिला येथेही हवं होतं.

जशीजशी आखाडी जवळ येत होती तशीतशी तिची नजर रस्त्यावर लागून राहू लागली. आज ना उद्या माझा बाबा येतील अन् मला घेऊन जाईल या आशेने.. एक दिवस असेच जनीचे सारे काम आटोपून झाले होते. सुपात दळण घेऊन ती अंगणात पाखडत बसली होती. दाण्यातला एकएक खड़ा पारखुन दळणाच्या बाहेर फेकून देत होती. तिची सासू बाजारात गेली होती. लंगड़ा दिर आणि नवराही कामानिमित्त बाहेर गेला होता. ती एकटीच घरात होती. ती दळण निसन्यामधे मग्न होती आणि अचानक सावकार तिच्या समोर येऊन ठाकला. जनीची नजर त्याच्याकडे गेली अन् त्याला अचानक समोर बघून तिची छाती जोरजोरात धडधडायला लागली. आज तो जास्तच नशेमधेच होता. त्याला धड उभेही राहता येत नव्हते. त्याचे डोळे लालबुंद होते. त्या लाल डोळयात दारूच्या नशेपेक्षा वासनेची नशा जनीला अगदी स्पष्ट दिसू लागली. त्याला बघून जनी उठली अन् घरात जाऊ लागली. ते बघून सावकार म्हणाला,

"जने... कुठंय तुही सासू? हाय का घरात. "

जनी डोक्यावरचा पदर आणखी खाली करत म्हणाली,

"न्हाय.. थांबून या. घरात कोण न्हायी.. "

" बर्... एक ग्लास पाणी तं दे प्यायलं. "

जनी त्याला घाबरू लागली. पाणी देऊ का नको, विचार करू लागली. पाणी आणण्यासाठी गेली अन् हा आत आला तर...? पाणी देताना त्यानी माझा हात धरला तर. जनी तिथेच खाली मान घालून विचार करीत उभी होती. ते बघून सावकार पुन्हा बोलला,

"जने.. तू लय सुंदर हायेस पाह्य दिसायलं. आपल्या अख्या गावात तुह्या सारखी देखणी बाई न्हाई. त्या दिवशी तुलं भांडी घासताना त्या अवस्थेत पाह्यलं अन् ते चित्र डोळयापुढुन जायंनाच बा मह्या. "

सावकाराचे हे बोल ऐकून जनीच्या अंगावर काटाचं उभा राहीला. तिच्या अंगाला घाम फुटु लागला ती थरथरायला लागली. लांडग्याच्या पुढ्यात शेळी यावी अन् त्याने लचकण तिचे मांस तोड़ावे तशी अवस्था जनीची झाली होती. अजून पुढे काही अनर्थ होऊ नये म्हणुन जनी क्षणात भानावर आली आणि घरात जाऊन आतून दरवाजा घट्ट बंद केला. हे बघून सावकार पाय आपटीत जाऊ लागला. सावकार फुल्ल नशेत होता. त्याचा असा अपमान झाल्यामुळे तो एखाद्या  जखनी सापाप्रमाणे फणफणत रस्त्याने जात होता. जनीने काही न बोलता दरवाजा लावला त्यामुळे त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. त्याला जनीकडून ही अपेक्षा नव्हती. तो ज्या रस्त्याने जात होता त्याच रस्त्याने जनीचा नवरा आणि सासू येत होती. सावकाराला जाताना बघून जनीच्या सासूने त्याला आवाज दिला. जनीच्या सासूला बघून सावकार प्रचंड चिडला आणि रागाच्या भरात लालबुंद होऊन म्हणाला,

"वच्छे....! तुह्या घरात मलं काही इज्जत हाये का नाही?"

सावकाराला असे रागावलेले पाहून जनीची सासू आणि नवरा पेचात पडला. त्याचा राग शांत करीत जनीची सासू त्याला म्हणाली, "काय झालं सावकार...? असं रागावू नका. अगोदर शांत व्हा...! मह्या घरचं कुणी काही बोललं का तुम्हालं?"

"मी तुमच्यावर येवढा भरवसा ठेवला अन् तूही सून...."

"काय केलं जनीनं सावकार.....?"

"मी तूलं बोलायाला आलो होतो तू नव्हती म्हणून माघारी जाता जाता फक्त तुह्या सूनलं एक गिलास पाणी मागितलं तर तिनं धाडकन दरवाजा बंद केला.. मी काय तीलं फालतू वाटतो का? तीलं सांग गावात किती वट आहे मही ते.."

"तिची इतकी हिम्मत...! ईज्या, तुह्या बायकोलं लय माज चढला.. एकदा पुन्हा हातातून काढावं लागतय तीलं"

"सावकार तुम्ही चला पुन्हा घरी, आता पहाच तीलं कशी हातातून काढते ते"

"नको नको, आता पुन्हा तुह्या घरी"

सावकार रागावलेला बघून जनीचा नवरा त्याला बोलला, "सावकार असे रागावू नका. पुन्हा तिच्याकडून अशी गलती नाही होणार. तुम्ही चला घरी. "

जनीच्या सासूला आणि नवऱ्याला माहीत होते की, जर सावकार आमच्यावर चिडला तर घेतलेले पैसे कधीही मागेल. आणि सावकारालाही हेच पाहिजे होतं, एकदा का त्याच्यासाठी जनीला मार पडला की जनी पुन्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष नाही करणार आणि तो बोलेल तसे ती करेल. खरेतर सावकार सर्वांच्या डोळ्यात धूळ फेकून जनीची शिकार करण्याचा तो डाव खेळत होता आणि त्या डावाचा पहिला दिवस आज होता. सावकार जनीसाठी वेडा झाला होता. रोज रात्री तो तिचेच स्वप्न पाहत होता. त्यामुळे जास्त ओढाताान न करता सावकार पुन्हा त्यांच्या सोबत जनीच्या घरी जावू लागला..

जनी अजूनही थरथरत होती. बिचारी जनी, तिची अवस्था खरबूज आणि चाकूच्या गोष्टीसारखी  झाली होती. जर तिने स्वतःहून जरी आपल्या नवऱ्याला सावकाराच्या करामती विषयी सांगितले असते तरीही घरच्यांनी तिच्यावरच संशय घेतला असता. सावकार जावून खूप वेळ झाला तरीही ती अजूनही बंद दरवाजाच्या आतच थरथरत बसली होती. तिनं सावकाराची धास्तीच घेतली होती. इकडे जनीची सासू मात्र  फणफणतच घराकडे येऊ लागली. कधी घरी जाऊ आणि जनीला बदडून काढू असे तिला झाले होते.  घरात  एकटी भीतीला कवटाळून बसलेल्या जनीच्या मनात विचारांनी थैमान घातले होते. ती आपल्या भविष्याचा विचार करून लागली, 'कसं होणार माझं? मंगली सारखं तर नाही होणार ना?  माझा सासरा असा आणखीन किती दिवस अंथरुणाला खिळून राहणार? सावकाराने काही माझे बरे वाईट केले तर माझा नवरा मला स्वीकारेल का? अशा  अनेक प्रश्नांचा काहूर तिच्या डोक्यात माजला होता. ती विचारांत गर्क असतांना अचानक दरवाज्याच्या कडीचा ठकठक आवाज आला तशी जनी भानावर आली. 'कोण आलं असेल.....?  पुन्हा सावकार तर नसेल ना आला..? जशी कडी ठकठ्क वाजत होती तशी तिच्या छातीत धडधड वाढायला लागली.

"जना ssss.. दरवाजा खोल बाई."

अरे हा आवाज...? 'हा आवाज तर माझ्या ओळखीचा!  ज्या आवाजाला मी काळजात जिवंत साठवून ठेवलंय. तोच हा आवाज. हो... हा आवाज तर माझ्या बाबांचा...! अरे, माझे बाबा आलेत. म्हणजे बाहेर माझे बाबा उभे आहेत.'

क्षणांचा विलंब न करता जनी धावतच दरवाजा जवळ गेली आणि दरवाजा उघडला. समोर बाबाला बघून जनीच्या डोळयातून आनंदाश्रू आपोआपच ओघळायला लागले. जनीचा बाप तिला आखाडीच्या सणासाठी घेऊन जायला आला होता. ज्या क्षणाची जनी आतुरतेने वाट बघत होती, एकेक तास एकेक दिवस मोजत होती तो क्षण आज आला होता. बाबाला समोर बघून जनीने बाबाला मिठी मारली आणि ओक्साबोक्शी रडायला लागली,

"अगं थांब वेडे.. येवढं रडतेस का? मी तूला घ्यायलाच आलोय.."

"बाबा.. का एव्हढा उशीर केला? लवकर यायचं व्हतं ना.. मला किती आठवण येत होती तुमची अन आईची.."

" अरे हो... आता मस्त नव दहा दिवस रहा माहेरात."

समोर बाबाला पाहून जनी सारं काही विसरून गेली. धावतच जावून रांजणातून पाणी आणून पाय धुवायला दिले. घरात बसायला टाकलं चहा केला तिला आता माहेराची ओढ लागली होती. बाबाला समोर बघून ती म्हणाली,

"बाबा, आई कशी आहे. माझ्या मैत्रिणी कशा आहेत. आपलं घर, वावर, बैल सर्व काही ठीक आहे ना..?"

हे ऐकून जनीचा बाप हसून तिला म्हणाला,

" होय पोरी.. सारं काही ठीक आहे. तू ये माहेरात आन सर्व तू तुह्या डोळयांन पहा. हाहाहा sss."

दोघे बाप लेकरं हसत हसत बोलत होते तेवढ्यात जनीची सासू, नवरा अन सावकार आला. घर जवळ येताच जनीची सासू जोरजोरात तिला आवाज द्यायला लागली.

"जने ए जने, बाहीर ये"

सासूचा असा तापलेला आवाज बघून जनी हातातील सारे काम टाकून बाहेर आली. तिच्या बरोबर तिचा बाबाही बाहेर आला. तिच्या बाबाला आलेला बघून, भट्टीत तप्त झालेल्या लोखंडाला पाण्यात बुडवून थंड करावे. अगदी असाच जनीच्या सासूचा राग शांत झाला. जनीवर वटारलेले डोळे तिने तिच्या बाबावर फिरवत म्हणाली,

"आले, इतक्या लवकर... अजून आखाडीला एक हप्ता बाकी हाये."

त्यावर जनीच्या बापाने हसत उत्तर दिले.

"कशा आहात, तब्येत कशी आहे सर्वांची."

"कशी दिसते तुम्हालं"

जनीच्या बापाला जनीच्या सासूचा स्वभाव माहीत होता त्यामुळे जनीचा बाप हसत तिला म्हणाला,

"आमचे इव्हाई कसे आहेत.  त्यांच्या तब्येतीत काही सुधारणा झाली का नाही."

"ते तुम्हीच जावून पहा त्यांच्या खोलीत. आन हो, तुमच्या या लाडक्या पोरीलं काही संस्कार बिंस्कार शिकवले का नाही तुम्ही."

"का... काय झालं..? ती कुणाला काही चुकीचं बोलली बीलली का?"

"हे आमच्या गावचे सावकार. गावात यांचा एवढा मोठा मानसन्मान आहे. आज हे कामानिमित्त आमच्या घरी आले आन त्यांनी साधं जनीकडं पियालं पाणी मागितलं तर जनी पाणी न देता दरवाजा बंद केला. हीला असेच वागायचे असेल तर तिला तिकडेच ठेवा.."

"नाही, जनी तशी वागणारच नाही. त्यांचा काहीतरी गैरसमज झाला असेल. तिच्या तर्फे मी माफी मागतो सावकाराची."

"बरं बरं " असे बोलून, जनीचा बाप आलेला पाहून सावकारांने जनीच्या सासूचा निरोप घेत काढता पाय घेतला. जनीची सासू जनीच्या बापाकडे बघून वाकडं तोंड करीत घरात गेली. जनीचा नवराही जनीच्या बापाला न बोलताच आत गेला. जनीचा बाप मात्र हात जोडून दारातच उभा होता. घरातल्या लोकांच्या अशा वागण्याने जनीच्या बापाला कळून चूकले की, जनीला येथे खूप सासरवास आहे. पण तोही असहाय्य होता. तो तिचा सासरवास तीळभरही कमी करू शकत नव्हता. त्यांना असे दुखात बघून जनीने त्यांच्या हाताला धरून आत येण्याची विनंती केली. खरेतर जनीला आता सासूच्या माराची आणि बोलण्याची सवयच झाली होती. पण आज तिच्यामुळे तिच्या बापाला बोलणे खावे लागले याचे तिला फार वाईट वाटले. तरीही तिचे मन आज फार प्रसन्न आणि उल्हासित होते. सूर्य मावळतीला जावून आता अंधार पडत चालला होता. पण जनीचे रोमरोम मात्र आज प्रकाशमय झाले होते. हा अंधार तिच्या तेजमय प्रकाशापुढे जणू गायब झाला होता. तिचा फक्त आज रात्रभरच या घरात मुक्काम होता. सकाळच्या पहिल्या किरणासोबत ती आपल्या माहेरचा रस्ता धरणार होती. जनी रोज जी स्वप्नं पाहत होती ती वेळ आज जवळ आली होती. उद्या

ती तिच्या माहेरी जाणार होती. माहेरातले ते घर, अंगण, मित्र मैत्रिणी ती रोज स्वप्नात पाहत होती आणि त्या आठवणीत जगत होती तेच तिला प्रत्यक्ष डोळयाने बघायची वेळ आता जवळ आली होती. तिचे मन एकसारखे माहेराकडे जाणाऱ्या रस्त्यावर धाव घेत होते. आजच्या रात्रीचे एक एक मिनिट तिला एका एका दिवसा प्रमाणे वाटत होता. तिला या पिंजऱ्यातून मुक्त होऊन आपल्या आई वडिलांना खूप काही सांगायचे होते. त्यांना कसे धोक्यात ठेऊन लग्न लावले, पहिल्या सुनेला कसे जिवंत जाळले, त्यातून सुटण्यासाठी सावकाराच्या नावावर केलेले हे घर आणि जमीन, हे सारं काही सांगून जनीला या पिंजऱ्यातून मुक्त व्हायचे होते. तिला पुन्हा तीच पहिली जनी बनायचे होते.

मनसोक्त बागडणारी, दिसेल त्याच्या खोड्या काढणारी, आपल्या आई बापाची लाडकी आणि मित्र मैत्रिणींची सखी... जनी

जनीची उर्वरित कहाणी

## "पिंजरा 2" मधे

लवकरच.......

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.